सकाळ

# शांततेसाठी व्यावसायिकांची कारने जगभ्रमंती

## तीनशे दिवसांत ७० हजार किलोमीटर प्रवास करण्याचा संकल्प

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १० : 'जग जोडा, शांतता अनुभवा अन् जीवन साजरे करा' असा संदेश देण्यासाठी मुंबईतील व्यावसायिक प्रवीण मेहता आणि त्यांचे मित्र डॉ. सुधीर बलदोटा जगभ्रमंतीला निघाले आहेत. तेही कारने... त्यांच्या जगप्रवासाची सुरुवात सोमवारी (ता. ८) सांताक्रूझमधील 'रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्ट'च्या कार्यालयापासून करण्यात आली. तब्बल साठ देशांची सफर दोघे कारमधून करणार आहेत. त्यासाठी ते तीनशे दिवसांमध्ये ७० हजार किलोमीटर प्रवास पूर्ण करणार आहेत.



जगभ्रमंतीवर निघालेले प्रवीण मेहता आणि डॉ. सुधीर बलदोटा.

आशिया, युरोप, दक्षिण अमेरिका आणि उत्तर अमेरिका उपखंडांमधून प्रवास करत मेहता आणि बलदोटा विविध देशांमधील साधारण १२० मान्यवरांची भेट घेणार आहेत. समाजासाठी बहुमूल्य योगदान देणाऱ्या विविध क्षेत्रांतील लोकप्रिय व्यक्तींचा त्यात समावेश असेल. राजकारणी किंवा सेलिब्रिटींच्या पलीकडे जात विविध समाजस्तरांवर काम करणारे आणि इतरांसाठी प्रेरणा ठरणाऱ्या सर्वसामान्यांची ते भेट घेणार आहेत. शास्त्रज्ञ, संशोधक, कलाकार, सामाजिक व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते, रेडिओ जॉकी, लेखक, शिक्षक आणि समाजामध्ये प्रगती घडवून आणणाऱ्या व्यक्तींचा त्यात समावेश असेल. रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्टने उपक्रमाला पाठबळ दिले आहे. 'परिवर्तनाच्या मार्गावरील यशोगाथा' असे त्यांच्या मोहिमेचे वर्णन त्यांनी केले आहे.